शिक्षण संचालनालय
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
महाराष्ट्र राज्य
मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

Government of Maharashtra
DIRECTORATE OF EDUCATION
(Secondary & Higher Secondary)
Maharashtra State
Central Building, Dr. Annie Besant Road, Pune-1

w'site : education.maharashtra.gov.in Phone : (020) 2612 0361 e-mail : doecentralize11state@gmail.com


परिपत्रक

क्र.विद्या-ए-१/११.प्रवेश/२०२६/
दिनांक-११/०३/२०२६

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
शिक्षणाधिकारी (माध्यमिक) (सर्व)

विषय- राज्यातील इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन.२०२६-२७ ची कार्यवाही सुरु करणे व त्यासाठी करावयाच्या पूर्वतयारीबाबत

संदर्भ- शासन निर्णय क्र.प्रवेश-१२२५/प्र.क्र.१६/एसडी-२ दिनांक.२५/०२/२०२५

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या "इज ऑफ लिविंग" या कार्यक्रमांतर्गत इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संदर्भीय शासन निर्णयानुसार सन.२०२५-२६ पासून राज्यातील उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये इ.११वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन प्रणालीद्वारे करण्यात येत आहेत.

सन.२०२६-२७ मधील इ.११वी प्रवेश प्रक्रिया कार्यवाही सुरु करण्यात येत असून त्यानुषंगाने आवश्यक मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळावे व योग्य पूर्वतयारी करता यावी यासाठी पुढील बाबी संबंधितांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

- सन.२०२६-२७ मध्ये महाराष्ट्र राज्यातील राज्यमंडळाशी संलग्न सर्व उच्च माध्यमिक विद्यालये/ कनिष्ठ महाविद्यालयांतील इ.११वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येतील.
- ज्या विद्यार्थ्यांना राज्यातील राज्यमंडळ संलग्न इ.११वी मध्ये प्रवेश घ्यावयाचा असेल अशाच विद्यार्थ्यांनी या प्रणालीच्या मध्यमातून अर्ज करावा. अन्य मंडळाशी संलग्न विद्यालयात प्रवेशासाठी संबंधित विद्यालयांशी संपर्क साधावा. तथापि, अन्य मंडळाच्या शाळांमधून इ.१०वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना राज्यमंडळ संलग्न इ.११वी मध्ये प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्यांना या प्रणालीद्वारे अर्ज करता येईल.
- शेवटचा विद्यार्थी प्रविष्ट होईपर्यंत प्रवेश प्रक्रिया ही गुणवत्तेनुसार व निकषांनुसार ऑनलाईन पध्दतीने करण्यात येईल. ऑनलाईन प्रणाली व्यतिरिक्त अन्य कोणत्याही मार्गाने शाळांना प्रवेश करता येणार नाही.
- सदर प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यास दिलेल्या संकेतस्थळ/ पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करुन प्रवेशाबाबत पुढील कार्यवाही करावयाची आहे. त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना राज्यातील इ.११वी वर्ग असलेली विद्यालये शोधणे, त्यांमध्ये उपलब्ध शाखा/ माध्यम, प्रवेश क्षमता/ रिक्त जागा तपासणे त्याचप्रमाणे प्रवेशासाठी अर्ज करणे, इत्यादी सुविधा ऑनलाईन उपलब्ध होतील.
- इ.११वी प्रवेश प्रक्रियेमध्ये सुलभता येण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

A. कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी उपलब्ध जागांची विभागणी

| | | अल्पसंख्याक विद्यालये | बिगर अल्पसंख्याक विद्यालये | शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांची विद्यालये |
|---|---|---|---|---|
| १ | केंद्रीय प्रवेश फेरीद्वारे प्रवेश (CAP Seats) | ३५% | ८५% | ५०% |
| २ | संस्थांतर्गत कोटा (In-House Quota) | १०% | १०% | ५०% |
| ३ | व्यवस्थापन कोटा (Management Quota) | ५% | ५% | लागू नाही |
| ४ | अल्पसंख्याक कोटा (Minority Quota) | ५०% | लागू नाही | लागू नाही |

- इनहाऊस कोटा- उच्च माध्यमिक विद्यालय चालविणाऱ्या संस्थेचीच माध्यमिक शाळा परिसरात अथवा संबंधित जिल्ह्यात असेल तर अशा शाळेमधील इ.१०वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी लागू असेल.
- अल्पसंख्याक कोटा- फक्त अल्पसंख्याक कनिष्ठ महाविद्यालयात उपलब्ध असेल आणि या जागांवर अल्पसंख्याक प्रवर्गातील Minority विद्यार्थ्यांनाच प्रवेश देता येईल.
- व्यवस्थापन कोटा- हा त्या संस्थास्तरावरील प्रवेशासाठी असेल.
- कोणत्याही कोटांतर्गत जागांवर पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देणे व अनुषंगिक कार्यवाही वेळापत्रकानुसार सुरु राहील.

- कोटांतर्गत रिक्त जागा CAP साठी प्रत्यार्पित करण्याचा निर्णय शाळा स्तरावरुन घयावयाचा आहे. प्रत्यार्पित केलेल्या कोटांतर्गत जागा केंद्रीय प्रवेशासाठी पुढील फेरीमध्ये समाविष्ट होतील.

B. विद्यालयात इ.११वी मध्ये प्रवेश घेण्याचे मार्ग-

| | |
|---|---|
| इ.११वी मध्ये प्रवेशाचे ०२ मार्ग | • विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळविण्याचे दोन मार्ग असतील.<br>१.(CAP Seats) केंद्रीय प्रवेश फेऱ्यांद्वारे Allotment मिळवून. किंवा<br>२.(Quota Seats) कोटांतर्गत जागांवर संबंधित विद्यालयाशी संपर्क साधून. |
| टीपा- | • कोणत्याही मार्गाने प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भाग-१ व भाग-२ भरणे आवश्यक आहे.<br>• विद्यालयामध्ये फेरीमध्ये झालेले सर्व प्रवेश त्या-त्या वेळी ऑनलाईन पार्टलवर नोंदविले जातील.<br>• एका विद्यार्थ्यास CAP Seats तसेच Quota Seats दोन्हीसाठी अर्ज करता येईल. |
| CAP Seats<br><br>(Merit List by System) | • (CAP Seats) अंतर्गत जागांवरील प्रवेशाकरीता फेरीपूर्वी विद्यार्थ्यास अर्जाचा अर्ज भाग-२ मध्ये विद्यालये निवडता येतील. किमान-१ व कमाल-१० विद्यालयांचे पसंतीक्रम देता येतील.<br>• विद्यार्थ्यांनी दिलेल्या पसंतीक्रमानुसार CAP प्रवेश फेरीमध्ये प्रवेशासाठी विद्यालय निवडून Allotment देण्यात येईल व मिळालेल्या (Allotted) विद्यालयात जाऊन विद्यार्थी आपला प्रवेश निश्चित करतील. |
| QUOTA Seats<br><br>(Merit List by Jr College) | • (Quota Seats) अंतर्गत प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना विद्लयांचे पसंतीक्रम Quota Choices देता येतील.<br>• कोटांतर्गत प्रवेशासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची यादी संबंधित विद्यालयांना ऑनलाईन दिसेल. सदर यादीनुसार विद्यालये कोटा निहाय गुणवत्ता व निवड यादी तयार करतील व प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना कळवतील.<br>• कोटा प्रवेशासाठी पात्र ठरलेले विद्यार्थी संबंधित विद्यालयात आपला प्रवेश निश्चित करतील. |

C. विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेशाचे टप्पे-

१. (Student Registration) विद्यार्थ्यांने प्रवेश प्रक्रियेच्या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करणे.

२. (Application Form-१) विद्यार्थ्यांने आपला प्रवेश अर्ज भाग-१ ऑनलाईन भरणे व प्रमाणित (Verify) करुन घेणे.

३. (Option Form-२) प्रवेशासाठी विद्यालये निवडून आनलाईन अर्ज भाग-२ पसंतीक्रम भरणे व प्रवेश फेरीत सहभागी होणे. (प्रवेशासाठी विविध प्रवेश फेऱ्यांचे आयोजन करण्यात येईल, त्याचे वेळापत्रक त्या-त्या वेळी जाहीर करण्यात येईल.)

४. (Allotted) फेरीमध्ये प्रवेशासाठी मिळालेले विद्यालय तपासणे व त्या विद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करणे.

५. (Not Allotted) प्रवेशासाठी विद्यालय मिळाले नसल्यास पुढील प्रवेश फेरीसाठी अर्ज भाग-२ (Option Form) भरणे.

६. (ATKT) राज्यमंडळाच्या एटीकेटी सुविधा प्राप्त विद्यार्थ्यांना पुरवणी परीक्षा निकालानंतर नोंदणी व प्रवेशाची संधी मिळेल.

D. इ.११वी प्रवेश प्रक्रियेसाठी लागू असलेले आरक्षण-

१. सदर प्रवेश प्रक्रियेसाठी संविधानिक तसेच समांतर आरक्षण लागू असेल. संविधानिक आरक्षणांतर्गत जागा पहिल्या तीन नियमित फेऱ्यांपर्यंत त्या-त्या प्रवर्गातून भरण्यात येतील. त्यानंतर होणाऱ्या विशेष फेऱ्यांत राखीव प्रवर्गाचे उमेदवार न मिळाल्यास रिक्त जागा खुल्या प्रवर्गातून भरण्यात येतील.

२. संविधानिक/सामाजिक आरक्षणांतर्गत राखीव जागा (बिगर अल्पसंख्याक शाळा)

| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वैधानिक आरक्षण प्रवर्ग | अनुसूचित जाती (SC) | अनुसूचित जमाती (ST) | वि.जा.अ (VJ-A) | भ.ज. ब (NT-B) | भ.ज. क (NT-C) | भ.ज. ड (NT-D) | वि.मा.प्र. (SBC) | इ.मा.व. (OBC) | सा. व शै. मागासवर्ग (SEBC) | आर्थिक दुर्बल घटक (EWS) | खुला GEN |
| राखीव जागा | **१३%** | **७%** | **३%** | **२.५%** | **३.५%** | **२%** | **२%** | **१९%** | **१०%** | **१०%** | **२८%** |

३. समांतर आरक्षण/विशेष आरक्षण-

| क्र | विशेष आरक्षण | जागा |
|---|---|---|
| १ | महिला | **३०** % |
| २ | दिव्यांग/ अपंग | **४** % |
| ३ | प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त | **२** % |
| ४ | अ) राज्याबाहेरुन बदलीने आलेल्या नोकरदार कर्मचाऱ्यांचे पाल्य.<br>ब) आजी-माजी सैनिकांच्या पत्नी/ पाल्य व स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य<br>क) आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये विजेते/सहभागी खेळाडू व राष्ट्रीय स्तरावरील पदकविजेते खेळाडू. | **५** % |
| ५ | अनाथ (खुल्या प्रवर्गातून) | **१** % |
| | अनारक्षित Pure | **५८** % |

E. विद्यार्थ्यांनी इ.११वी प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे तयार ठेवणे-

१. प्रवेश अर्जाचा भाग-१ भरतेवेळी आरक्षण व गुणांची पडताळणी करण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्रे अपलोड करावी लागतात. त्याचप्रमाणे प्रवेश निश्चित करतांना सदर प्रमाणपत्रांची मूळ प्रत सादर करावी लागते. म्हणून संबंधित प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांनी वेळेपूर्वीच प्राप्त करुन ठेवणे आवश्यक आहे.

२. पुढील प्रमाणपत्रे आवश्यक असतात. (आपणास लागू असलेली प्रमाणपत्रे तयार ठेवावीत)

| | |
|---|---|
| **कोणत्याही आरक्षणाचा लाभ न घेणारे उमेदवार** | • Std.१०th or equivalent Marks Statement.<br>• Last School Leaving Certificate |
| **आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी** | • Std.१०th or equivalent Marks Statement.<br>• Last School Leaving Certificate<br>• Domicile Certificate/ महाराष्ट्राचा रहिवासी दाखला.<br>आणि लागू असणारे आरक्षणाबाबत प्रमाणपत्र खालीलपैकी- |
| सामाजिक / वैधानिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी | (लागू असेल ते एक) |
| SC, ST प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी | • Caste Certificate |
| VJ/NT, OBC, SBC, SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी | • Caste Certificate + Non- Creamy Layer Cerfiticate |
| EWS प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी | • EWS eligibility certificate |
| समांतर/ विशेष आरक्षणाचा लाभ हवा घेण्यासाठी | (लागू असेल ते एक) |
| Divyang/ Disabled प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी | • UDID Card/ Disability Certificate of Civil Surgeon |
| Project affected/ Earthquake affected<br>आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी | • Collector's certificate |
| Wards of Transferred Employees<br>राज्याबाहेरुन बदलीने आलेल्या कर्मचाऱ्यांचे पाल्य | • Parent's Transfer order and Joining report |
| Wards of Defence Servicemen and Ex. Servicemen<br>आजी-माजी सैनिकांच्या पत्नी/पाल्य | • Service Certificate or District Sainik Board Certificate |
| Nomenees of Freedom Fighters<br>स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य | • Collector's Certificate |
| Student Sports person<br>आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील पदकविजेते खेळाडू. | • Certificate issued by district sports officer |
| Orphan applicants अनाथ बालके | • Certificate by women and family welfare department. |

३. सामाजिक / वैधानिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी जातीचा दाखला महाराष्ट्रातील असणे आवश्यक आहे.

४. समांतर/ विशेष आरक्षणाचा लाभ हवा असल्यास तसे प्रमाणपत्र (स्वत: चे) सादर करावे लागेल.

५. आरक्षणाबाबत प्रमाणपत्र सादर न केल्यास अशा विद्यार्थ्याचा अर्ज खुल्या प्रवर्गातून ग्राह्य धरला जातो. अर्थात कोणत्याही आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा नसल्यास आरक्षणाबाबत प्रमाणपत्र आवश्यक असणार नाही.

६. इ.११वी प्रवेशासाठी वरीलप्रमाणे आपणास लागू होणारी प्रमाणपत्रे / दाखले विद्यार्थ्यांनी वेळेत मिळवून ठेवणे हिताचे आहे.

विद्यार्थ्यांसह सर्व संबंधितांनी प्रवेश प्रक्रियेच्या पोर्टलवर प्रकाशित करण्यात येत असलेल्या माहितीपुस्तिकेचे व्यवस्थित अध्ययन करावे तसेच प्रवेश प्रक्रियेदरम्यान पोर्टलवरुन देण्यात येणाऱ्या सूचना ह्या अद्ययावत समजाव्यात.

विद्यार्थ्यांना आरक्षणाचा लाभ घेता यावा यासाठी अशा विद्यार्थ्यांना आवश्यक कागदपत्रे वेळेत मिळवून देण्यासाठी विशेष मोहिम राबविणेबाबत विनंती सबंधित महसूल यंत्रणेस करणे, माध्यमिक शाळांनी आपले विद्यालयातील इ.९वी १०वी मधील विद्यार्थ्यांना याबाबत सूचित करून शाळेत असतांनाच अशी कागदपत्रे मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे अशा उपाययोजना कराव्यात.

इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रक्रिया २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रियेचे टप्पे समजावून घेऊन त्यानुसार नियोजन करावे. प्रवेश प्रक्रियेचे फेरीनिहाय वेळापत्रक यथावकाश प्रसिद्ध करण्यात येईल. प्रवेश प्रक्रियेबाबत व्यापक प्रसिद्धी द्यावी. शंका समाधान व्यवस्था कार्यान्वित करावी. इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रक्रियेचे टप्पे व अन्य आवश्यक बाबींना प्रसिद्धी देऊन पुढील कार्यवाही करावी. सुरवातीस उच्च माध्यमिक विद्यालयांची नोंदणी पूर्ण करावयाची असून त्यानंतर विद्यार्थी नोंदणी सुरु करता येईल. तत्पुर्वी जनजागृती कामकाज होणे आवश्यक आहे.

विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व विद्यालये पोर्टलवर अचुकपणे नोंदणीकृत झाली असल्याची व नियमानुसार प्रवेश क्षमता, शुल्क इत्यादी सर्व माहिती अचूक नोंदविली आहे याची खात्री करावी. मार्गदर्शन केंद्र, शाळा, विद्यालये, विद्यार्थी, पालक यांचेसाठी प्रशिक्षण/ उद्बोधन सत्रांचे आयोजन राज्यमंडळ इ.१०वी परीक्षा संपताच करावे.

प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांचे अर्ज अचूक भरले जावेत, ते त्वरीत व अचूकपणे प्रमाणित व्हावेत यासाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी मार्गदर्शन केंद्रांची स्थापना करावी. माध्यमिक शाळांनी आपल्या शाळेतून इ.१०वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी प्रवेश अर्ज भरण्यासाठी पुरेपुर साहाय्य करावे. विद्यार्थ्यांनी अर्जात भरलेली माहिती शक्यतो त्याच्या इ.१०वी उत्तीर्ण शाळेतूनच प्रमाणित केली जाईल अशी व्यवस्था करावी. अन्य विद्यार्थ्यांसाठी इ.११वी प्रवेश देणाऱ्या शासकीय/ अनुदानित विद्यालयांमध्ये आवश्यकतेनुसार मार्गदर्शन केंद्रांची स्थापना करावी.

इ.११वी मध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन विद्यार्थी, पालकांना मिळावे व प्रवेशाबाबत सर्व सूचना वेळेत निर्गमित करता याव्यात यासाठी गट शिक्षणाधिकारी व क्षेत्रीय यंत्रणा यांना प्रशिक्षित करुन एकंदर संनियंत्रण गतीमान करावे. पडताळणी कामकाज व विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी यंत्रणा तयार करावी.

Portal URL व तपशीलवार सूचना यथावकाश देण्यात येतील तरी, वरील सूचना संबंधितांचे निदर्शनास आणाव्यात.

पुणे,
दिनांक-११/०३/२०२६

Digitally signed by
Mahesh Madhukar Palkar
Date: 16-03-2026
21:18:47

(डॉ. महेश पालकर)
शिक्षण संचालक
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)